# कल्याण डोंबिवली व्हिजन

Year 08 : Issue 2 : Pages : 4 Kalyan, Dist. Thane : Tuesday, 12 Oct To 18 Oct 2021 : Price 2.00 : RNI. No. MAHBIL/2014/56983

वर्ष : ०८ * अंक : २ * पाने : ४ कल्याण, जि. ठाणे, * मंगळवार, १२ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२१ मूल्य : रु. २.००/- * नोंदणी क्रमांक एमएएचबी आयएल/२०१४/५६९८३


## जांभळी नाका परिसरामध्ये मोठे रक्तदान महायज्ञ शिबिर

कल्याण (प्रतिनिधी) : मुख्यमंत्र्यांच्या आवाहनानंतर रक्तदान महायज्ञसाठी कल्याण होऊन हजारो नागरिक ठाण्याला रवाना रक्ताचा तुटवडा असल्याने शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जनतेला रक्तदान करण्याचे आव्हान केले होते त्याला सकारात्मक प्रतिसाद देत रक्ताची गरज असलेल्या रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी विविध सामाजिक संस्था संघटनांकडून राज्यभरात ठिकठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहे त्याचप्रमाणे पालक मंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यातील सर्व नगरसेवक व कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणात रक्त दान करण्याचे आवाहन केले ठाण्यातील





जांभळी नाका परिसरामध्ये मोठे रक्तदान (पान ३ वर)




### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कल्याण पूर्व चे मध्यवर्ती कार्यालयापासून

## शेतकऱ्यांचे विरोधातल्या आंदोलनास सुरुवात

कल्याण (प्रतिनिधी) : उत्तर प्रदेशातील लखिंपुर मधील शेतकऱ्यावर झालेल्या अन्यायाविरोधात कल्याण पूर्व विभागात महा विकास आघाडीच्या वतीने महाराष्ट्राचे पक्षाध्यक्ष माननीय नामदार जयंतराव पाटील जी कल्याण-डोंबिवली जिल्हाध्यक्ष माननीय जगन्नाथ (अप्पासाहेब) शिंदे कार्याध्यक्ष वंडार पाटील यांच्या आदेशाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कल्याण पूर्व चे मध्यवर्ती कार्यालयापासून शेतकऱ्यांचे विरोधातल्या आंदोलनास सुरुवात करण्यात आली राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयापासून नाना पावशे चौक दुर्गा माता मंदिर गणेश विद्या मंदिर लालन स्टोअर ते गणपती चौक कोळसेवाडी पासून तानाजी चौक जुने पोलीस स्टेशन मार्ग शिवसेना कार्यालय समोर ते काटेमानिवली शाळा मार्ग तानाजी चौक ते काटेमानिवली नका या ठिकाणी चौकात शेतकऱ्यांच्या विरोधात केंद्र सरकारच्या विरोधात घोषणा देऊन सर्व व्यापाऱ्यांना आव्हान करण्यात करण्यात





आले की आपण शेतकरी च्या विरोधात आंदोलनामध्ये सामील व्हावे अशी विनंती महाआघाडीच्या च्या वतीने करण्यात आले व्यापाऱ्यांनी १००/शंभर टक्के बंद ठेवून दुकाने बंद ठेवल्याबद्दल आघाडीच्या वतीने त्यांना धन्यवाद या बंदमध्ये महाआघाडी च्या वतीने राष्ट्रवादीचे अर्जुन नायर सारिका ताई गायकवाड मीनाक्षी आहेर मनोज नायर विजय मोरे सुभाष गायकवाड एकनाथ म्हात्रे प्रकाश तारे जानू वाघमारे अशोक घोडके विनोद राऊत अमित उपाध्याय प्रकाश सोनवणे शिवसेनेच्या वतीने शरद पाटील हर्षु पालांडे हेमंत चौधरी प्रशांत काळे राधिका गुप्ते जाधव मॅडम व सर्व महा विकास आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी या आंदोलन सहभागी झाल्याबद्दल जिल्हा सरचिटणीस मनोज नायर यांनी सर्व कार्यकर्त्यांचे व पोलीस अधिकारी कर्मचारी यांचे आभार मानले काटेमानिवली नाका येथे आंदोलन समाप्त करण्यात आले त्यानंतर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्व पदाधिकारी पदाधिकारी कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन कोळसेवाडी पोलीस स्टेशनला घेऊन गेले व त्यांनी त्यांची कार्यवाही करून सर्वांना सोडण्यात आले आपला विश्वासू मनोज नायर जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कल्याण डोंबिवली जिल्हा

## माजी नगरसेवक महेश गायकवाड यांचा वाढदिवस समाजकार्यातुन साजरा

कल्याण (प्रतिनिधी) : कार्यसम्राट नगरसेवक महेश गायकवाड





यांचा वाढदिवस समाजकार्यातून साजरा करण्यात आला.

पालक मंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेशानुसार कार्यकर्त्यांना घेऊन ठाण्यात येथे रक्तदान केले. हेदुस गावामध्ये रिक्षावाल्यांच्या मागणीनुसार त्यांना स्टॅन्ड उपलब्ध करून दिले. रुग्णांना हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यासाठी त्रास होत होता म्हणून त्यांना एक ॲम्बुलेंस दिली.

कार्यक्रमाप्रसंगी खासदार श्रीकांत शिंदे यांनी महेश गायकवाड यांना शुभेच्छा दिल्या तसेच विजय नगर येथील ज्ञान मंदिर शाळेमध्ये जाऊन गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय फी ची मदत केली . तसेच कल्याण पूर्व मधील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा मिळवण्यासाठी महानगरपालिकेकडे केलेली मागणी व पाठपुराव्यामुळे प्रभाग क्रमांक ८८ अमेय हाइट्स संतोष नगर तिसगाव प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणी कामाचा शुभारंभ करण्यात आला.

अंबरनाथ तालुक्यातील गोळवले, गोरपे, सिरवली गाव येथे आदिवासी पाडा या ठिकाणी जाऊन अन्नधान्य वाटप केले. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप केले आणि पावसामुळे लोकांच्या घराचे नुकसान झाले अशा लोकांना एक मदतीचा हात म्हणून त्यांना आर्थिक मदत केली.

(पान ३ वर)

## लोकलमधून उडी मारुन मायलेकांचा आत्महत्येचा प्रयत्न

### विद्याविहार-घाटकोपर दरम्यानची घटना

मुंबई (प्रतिनिधी) : धावत्या लोकलमधून उडी मारुन मायलेकांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना विद्याविहार-घाटकोपरदरम्यान घडली. बानू सहदेव मोरे असे मृत महिलेचे नाव असून तिचा सात वर्षांचा मुलगा हा वाचला आहे. बानूच्या आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही. घडल्या प्रकरणी कुर्ला रेल्वे पोलिसांनी अपमृत्युची नोंद करुन तपास सुरु केला.

बानू ही कळवा येथे पती आणि सात वर्षाच्या मुलासोबत राहत होती. तिचा नवरा हा बिगारी काम करतो. शनिवारी रात्री बाराच्या सुमारास बानू आणि तिचा सात वर्षांचा मुलगा हे लोकलने जात होते. लोकल विद्याविहार-घाटकोपर



दरम्यान असतांनाच बानूने तिच्या मुलाला घेऊन धावत्या लोकलमधून उडी मारली. हा प्रकार लोकलमधये बसलेल्या प्रवशांनी कुर्ला रेल्वे पोलिसांना सांगितला. त्यानंतर कुर्ला रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी गेले. तेव्हा बानू आणि तिचा मुलगा जखमी अवस्थेत आढळून आला.

त्यांनतर पोलीस शिपाई करनुरे यांनी त्या मुलाला उचलून नेले. त्या मुलाला उपचारासाठी राजावाडी रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचार

(पान ३ वर)

## विमल वसंत भोईर यांच्या वतीने लसीकरण शिबिराचे आयोजन

कल्याण (प्रतिनिधी) : संपूर्ण राज्यात सध्या कोविड-१९ चा प्रादुर्भाव जरी कमी होत असला तरी त्यांच्या रोगप्रतिकार म्हणून नागरिकांसाठी प्रतिबंधात्मक लसीकरणाची मोहीम जास्तीत जास्त राबविण्याची आवश्यकता आहे. या उद्देशाने तसेच नागरिकांची लसीकरणासाठी ज्याप्रकारे वृद्ध नागरिकांची व ज्येष्ठ नागरिकांची धावपळ होते. तसेच प्रत्येक गावांमध्ये जाण्यासाठी एक तासाचे अंतर पार पाडावे लागते याचा नाहक त्रास वृद्ध व ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे देखील निदर्शनास येत आहे . हे लक्षात घेता प्रभाग क्रमांक ११९ माजी नगरसेविका विमल वसंत भोईर यांच्या पाठपुराव्याने कल्याण-डोंबिवली महापालिका अंतर्गत लसीकरण मोहीम मानेरे येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये चालू करण्यात आली आहे.

सध्या रेल्वे, मॉल्स तसेच इतर ठिकाणी प्रवेश करण्यासाठी लसीचे डोस अनिवार्य ठरत आहे . लसीचे दोन डोस घेतले नसेल तर परवानगी मिळत नाही हे



लक्षात घेता माजी सभापती प्रभाग क्षेत्र माजी नगरसेवक विमल वसंत भोईर व माजी सरपंच मानेरे वसंत लक्ष्मण भोईर यांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला त्यांच्या पाठपुराव्याला होकार देत जिल्हा परिषद शाळेमध्ये लसीकरण करण्यात आले. यावेळी माणेरे गावातील जास्तीत जास्त नागरिकांनी लसीकरणाचा लाभ घेतला. झालेल्या नागरिकांनी भोईर यांचे आभार व्यक्त केले

## अनिल आय हॉस्पिटलचे उद्घाटन थाटात संपन्न



डोंबिवली (प्रतिनिधी) : डोंबिवली पूर्वेतील गणेश मंदिर रोड येथे अनिल आय हॉस्पिटल चे उद्घाटन संपन्न झाले. कल्याण लोकसभा खासदार श्रीकांत शिंदे, प्रोफेसर तथा डॉक्टर महिपाल सचदेव यांच्या शुभहस्ते हॉस्पिटलचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉक्टर उमा हेरूर, डॉक्टर अनील हेरूर, डॉक्टर अनघा हेरूर उपस्थित होते.गेल्या कित्येक वर्षापासून अनिल आय हॉस्पिटल हे नागरिकांच्या चर्चेमध्ये आहे. या हॉस्पिटलमध्ये कल्याण-डोंबिवलीच नव्हे तर ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांचे उपचार झालेले आहेत. सर्वप्रथम डॉ. उमा हेरूर यांनी डोंबिवली शहरामध्ये अनिल आय हॉस्पिटल ची स्थापना केली. त्यानंतर पिढी रित्या मॅनेजिंग डायरेक्टर चा पदभार उमा हेरुर यांच्या सुनबाई डॉ. अनघा अनिल हेरूर यांनी १९९७ साली स्वीकारला.

डॉ. अनघा अनिल हेरूर हे वैद्यकीय संचालक आहेत आणि अनिल नेत्र रुग्णालयातील नेत्र शल्यचिकित्सक आणि मुंबई विद्यापीठाचे सुवर्णपदक विजेते आहेत. डॉ अनघा हेरूर तज्ञांच्या समर्पित टीमसह नेतृत्व भूमिका बजावतात.

डॉक्टर श्रीकांत शिंदे म्हणाले की नेत्रविकार विकारावरील फक्त उपचारांचे हॉस्पिटल नसून नेत्र विकारावरील वैद्यकीय शिक्षण देणारी आधुनिक तंत्रज्ञान युक्घ्त विविध पायाभूत सुविधा उपलब्ध असणारी संस्था निर्माण झाली आहे . वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी जमीन उपलब्ध करण्यासाठी आम्ही सहकार्य करू. हेरूर कुटुंबातील तिसरी पिढी आरोग्य सेवेत आहे. भविष्यात अनिल आय हॉस्पिटल डोंबिवलीचा मानबिंदू ठरेल.

आयोजित उद्घाटन समारंभात खासदार श्रीकांत शिंदे सह माजी स्थायी समिती सभापती दीपेश म्हात्रे, शिवसेना शहर अध्यक्ष राजेश मोरे , आशू सिंह , भाई पाणवडीकर यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी कार्यकर्ते समाजसेवक तसेच नागरिक उपस्थित होते. डॉक्टर अनिरुद्ध अनिल हेरूर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाची तहसीलदार कार्यालयावर धडक

कल्याण : उत्तर प्रदेशमध्ये गुंडाराज सुरु असल्याची टीका काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष सलीम शेख यांनी केली आहे. लखीमपूरमध्ये झालेल्या घटनेच्या निषेधार्थ कल्याणमध्ये काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाच्या कार्यकर्त्यांनी तहसीलदार कार्यालयावर धडक दिली. काँग्रेसच्या अल्पसंख्याक



विभागाचे जिल्हाध्यक्ष सलीम शेख यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी लखीमपूर घटनेचा निषेध करण्यासाठी तहसीलदार कार्यलयावर मोर्चा काढत तहसीलदारांना (पान ४ वर)

# संपादकीय...

## रुग्णालयांचे सक्षमीकरण

करोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेची पूर्वतयारी करताना दुसऱ्या लाटेत जाणवलेली आयसीयू खाटा व व्हेन्टिलेटरची कमतरता लक्षात घेऊन नवी मुंबई महापालिकेची नेरूळ व ऐरोली रुग्णालये करोना रुग्णालयांमध्ये रुपांतरित करण्यात येत आहेत. मात्र, यात सर्वसाधारण रुग्णांच्या उपचाराकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वाशी, तुर्भे व बेलापूर रुग्णालयांचे अधिक सक्षमीकरण व विस्तारीकरण केले जाणार आहे. याबाबतचे नियोजन करण्यासाठी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी गुरुवारी विशेष बैठक आयोजित करत करोना व 'नॉन कोविड' वैद्यकीय सुविधांच्या नियोजनाविषयी या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

नेरूळ व ऐरोली या रुग्णालयांचे करोना रुग्णालयांमध्ये रूपांतरण करताना सर्वसाधारण रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळताना कोणत्याही प्रकारे गैरसोय होणार नाही, याकडे लक्ष देत आयुक्तांनी या ठिकाणी सद्यस्थितीत दिल्या जात असलेल्या आयपीडी व ओपीडी सेवांची सविस्तर माहिती घेतली. सद्यस्थितीत नेरूळ येथील मॉंसाहेब मीनाताई ठाकरे रुग्णालय इमारतीत सर्वात वरच्या सहाव्या व सातव्या मजल्यावर तसेच ऐरोली येथील राजमाता जिजाऊ रुग्णालयात पाचव्या व चौथ्या मजल्यावर करोना रुग्णालयासाठी आयसीयू खाटा व व्हेंटिलेटर कक्षाचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर खालील मजल्यांवर सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या आयपीडी व ओपीडी सेवा वरील मजल्यांवर स्थलांतरित करून तेथे करोना रुग्णालय रुपांतरणाचे काम सुरू करावे व ते जलद करण्याच्या दृष्टीने कामावर बारकाईने लक्ष ठेवावे, असे निर्देश आयुक्तांनी वैद्यकीय अधीक्षक यांना दिले. बेलापूर व तुर्भे येथील माताबाल रुग्णालयांच्या विस्तारीकरणाची कामेही समांतर सुरू ठेवावीत व ती तत्परतेने पूर्ण करून घेण्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. नेरूळ व ऐरोली रुग्णालयाचे करोना रुग्णालयामध्ये रूपांतरण करताना जोपर्यंत त्याठिकाणी करोनारुग्ण दाखल होत नाहीत, तोपर्यंत सर्वसाधारण रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी ही रुग्णालये कार्यरत राहतील, असे आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले. या दोन्ही रुग्णालयांच्या इमारती प्रशस्त असून याठिकाणी सुरू असलेल्या काही आयपीडी व ओपीडी सेवा सर्वसाधारण रुग्णांसाठी तशाच उपलब्ध ठेवण्याबाबत या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. सद्यस्थितीत सिडको एग्झिबिशन सेंटरमधील ७५ खाटांच्या आयसीयू कक्षात २३ व एमजीएम रुग्णालय, कामोठे येथील १०० खाटांच्या आयसीयू कक्षामध्ये चार रुग्ण दाखल असून भविष्यात रुग्णसंख्या वाढल्यास नेरूळ व ऐरोली रुग्णालयांमध्ये तीव्र लक्षणे असणारे करोनारुग्ण दाखल केले जातील. तोपर्यंत ही रुग्णालये सर्वसाधारण रुग्णांना सेवा पुरविणार आहेत. नवी मुंबई महापालिकेची नेरूळ व ऐरोली ही दोन्ही रुग्णालये आयसीयू खाटा व व्हेन्टिलेटरसह करोना विरोधी लढ्याकरता सज्ज होत असून करोना कालावधीनंतर या रुग्णालयांचा उपयोग दर्जेदार उपचारासाठी होणार असल्याने याद्वारे आरोग्य विभागाच्या वैद्यकीय सुविधांचे सक्षमीकरण झाले आहे. या बैठकीला महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील तसेच वाशी, नेरूळ, ऐरोली रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक व बेलापूर, तुर्भे रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी आदी उपस्थित होते. नेरूळ रुग्णालय करोनामध्ये रूपांतरित झाल्यानंतर बेलापूर माता बाल रुग्णालयातील करोनाबाधित महिलांची प्रसूतीविषयक वैद्यकीय सुविधा नेरूळ रुग्णालयात स्थलांतरित करून बेलापूर रुग्णालयामध्ये पूर्णपणे सर्वसाधारण प्रसूती सुविधा देण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच, ऐरोली रुग्णालयामध्ये करोना उपचार सुविधेची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येऊन वेगळ्या भागात 'नॉन कोविड' प्रसूतीपूर्व तपासणी व प्रसूतीपश्चात उपचार सुविधा कायम सुरू राहणार आहे. त्याचप्रमाणे वाशी येथील सार्वजनिक रुग्णालयातील डायलिसिस सुविधेचे विस्तारीकरण करून नेरूळ रुग्णालयातील डायलिसिस सुविधा करोना रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

**संस्थापक संपादक : राजेंद्र वखरे**
**संपादक : महादेव पंजाबी**
**उप संपादिका : वैष्णवी माळी**

पीआरबी कायद्यानुसार संपादकीय व वृत्तपत्रातील मजकुर, जाहिरातीची कायदेशीर संपूर्ण जबाबदारी महादेव पंजाबी यांच्यावर राहील. कायदेशीर बाबीसाठी न्यायक्षेत्र कल्याण.

साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वृत्त व इतर मजकूराबाबत काही वाद असल्यास साप्ताहिक प्रकाशित झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत संबंधितांनी त्याची नोंद घ्यावी. त्यानंतर आलेल्या तक्रारीची जबाबदारी व्यवस्थापनाची नसेल. तसेच वार्ताहर, लेखक यांच्या मताशी संपादक व व्यवस्थापन जबाबदार असेलच असे नाही.

# अंबरनाथ येथील आर्य गुरुकुल शाळेत मातृपूजन उत्साहाने साजरे

**अंबरनाथ (प्रतिनिधी) :** आर्य गुरुकुल, अंबरनाथ, शाळेने शुक्रवार ८ ऑक्टोबर २०२१ रोजी मातृपूजन उत्साहाने साजरे केले. ज्यांनी प्रेमाचा खरा अर्थ आपल्याला शिकवला त्याबद्दल कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त केले, जे आमच्यावर बिनशर्त आयुष्यभर प्रेम करतात आणि ते आहेत आमचे पालक. मातृ पितृपूजन हा सर्वात प्रिय व्यक्ती म्हणजेच पालक आणि मुले यांच्यात वास्तविक स्वरुपात प्रेमाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. या शुभप्रसंगी ६०० पालक आणि विद्यार्थ्यांनी पालकाविषयी असलेल्या श्रध्देची प्राचीन परंपरा साजरी करण्यासाठी हा कार्यक्रम ऑनलाईन पाहिला. या वर्षी आम्ही सुमारे २० पालक शाळेत त्यांच्या मुलांसह जमले. त्याप्रसंगी तेथे कोविड प्रोटोकॉल पाळले गेले आणि शाळेच्या अधिकाऱ्यांनी काळजी घेतली.



मातृ पितृपूजनाचे दिव्य विधी चिन्मय मिशन, ठाण्याच्या आचार्या स्वामिनी निष्कलानंदजी यांनी केले. विद्यार्थी आणि पालकांनी घरी आणि काही पालकांनी व त्यांच्या पाल्यांनी शाळेत उपस्थित राहून मातृपितृपूजनाचा कार्यक्रम साजरा केला. या उत्सवात पवित्र आणि आकाशीय, 'मातृस्तवनम श्लोक' समाविष्ट होते. आईच्या नि:स्वार्थ आणि बिनशर्त प्रेमाच्या स्तुतीमध्ये मातृस्तवनम श्लोकाचे उच्चारण केले. पूजेनंतर नंतर 'गरबा' खेळला गेला.

यावेळी बोलतांना श्रीयुत निलेश राठोर, प्रचार्य (आर्य गुरुकुल, अंबरनाथ) म्हणाले की, मातृपितृपूजनाची ही पारंपारिक पध्दती आई वडिलांच्या मूल्यांवर जोर देते आणि हा बंध साजरा करण्यास मदत करते. ते पुढे म्हणाले की आई आणि वडिलांच्या उपासनेची संकल्पना आपल्या जीवनशैलीमध्ये खोलवर रुजलेली आहे आणि आईला पहिला गुरु मानला जातो. वडिलांना दुसरा गुरु आणि आचार्य हे तिसरे गुरु मानले जातात. ते असेही म्हणाल्या की, मी कोणत्याही शाळेला अशा कार्यक्रमाचे आयोजन करतांना पाहिले नाही जे आमच्या मुलांमध्ये उत्तम मुल्ये रुजवते. आजच्या पिढीसाठी हे आवश्यक मुल्य आहे आणि इतर शाळांमध्येही त्याची पुरावृत्ती केली पाहिजे. त्यांनी यावर जोर दिला की ही परंपरा येत्या वर्षांसाठी आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी योगदान देईल. या कार्यक्रमाची सांगता शांतीपाठाच्या जयघोषाने झाली.

# कल्याण पूर्व येथील सेंट मेरीज शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

**कल्याण (खुशी माळी) :** कल्याण पूर्व येथील सेंट मेरीज शाळेत स्वर उत्सवाच्या माध्यमातून जणू शिक्षणांचाच उत्सव साजरा करण्यात आला. एज्युकेशन टुडे फाऊंडेशनचे संस्थापक भरत मलिक आणि डॉ. निलम मलिक यांनी ४ ऑक्टोबर पासून शाळा पुन्हा सुरु करण्याच्या सरकारच्या निर्णयाचे स्वागत करत या कार्यक्रमाचे आयोजन केले. १८ महिन्यांच्या दीर्घ प्रतिक्षेनंतर ४ ऑक्टोबर पासून पुन्हा एकदा शाळा सुरु होणार या पार्श्वभुमीवर तसेच गांधी जयंतीचे औचित्य साधून सेंट मेरीज शाळेत स्वर उत्सव साजरा करुन विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. अनेक विद्यार्थी व पलाक यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. संचालिका डॉ. नीलम मलिक व प्राचार्या दिव्या बोरसे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे शास्त्रीय संगीत विषारद प्रशांत ठाकरे व स्वधारा संगीत अकादमीच्या प्रमुख डॉ. गौरी कवी तसेच अमोल मिरजगावकर यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच आर्यग्लोबल संस्थेच्या संगीत विषयाच्या सर्व शिक्षकांनी 'चलो स्कुल चले' हे गाणे सदर करुन विद्यार्थी व पालकांचा उत्साह द्विगुणीत केला. याचबरोबर व विद्यार्थ्यांना दिले. तसेच ऑनलाईन आणि प्रत्यक्ष शाळेत म्हणजेच हायब्रीड शिक्षण ही संकल्पना स्पष्ट केली. त्याचप्रमाणे शाळेच्या



शास्त्रीय संगीत संबंधित अनेक कार्यक्रमांचे सादरीकरण करुन विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यात आले. संस्थेच्या संगीत विषयाच्या शिक्षकांनी 'स्वरधारा' कार्यक्रमाच्या माध्यमतून शास्त्रीय संगीताविषयी आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच संस्थेच्या संगीत विषयाच्या शिक्षकांनी देखील विविध कार्यक्रम सादर करुन उपस्थितांचे मनोरंजन केले.

तसेच संस्थेच्या सर्वेसर्व्या डॉ. निलम मलिक यांनी याप्रसंगी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला. तसेच कोविड महामारीच्या पार्श्वभुमीवर शाळा बंद असल्याने मागील १८ महिने विद्यार्थ्यांचे जे काही शैक्षणिक नुकसान झाले असेल, ते नक्कीच भरुन काढू असे अश्वासन पालक प्रचार्या दिव्या मॅडम यांनीही आपल्या भाषणातून विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुणे प्रशांत ठाकरे व डॉ. गौरी यांनी शास्त्रीय संगीताचे जीवनातील महत्व सांगितले. त्याचबरोबर उपस्थित असलेल्या विद्यार्थी व पालकांनी सुध्दा आपले कलागुण सादर केले. विशेष म्हणजे गांधीजींची वेशभुषा केलेले गृहस्थ सर्वांचे आकर्षण ठरले होते.

अशा संगीतमय वातावरणात व महत्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा या तत्वांचे स्मरण करुन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच कोविड महामारीमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्याची शपथ घेण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नांदीवली येथील आर्य गुरुकुलशाळेत मातृपूजन उत्साहाने साजरे

**कल्याण (खुशी माळी) :** आर्य गुरुकुल, नांदीवली शाळेने शनिवार दि. ९ ऑक्टोबर, २०२१ रोजी



मातृपूजन उत्साहाने साजरे केले. ज्यांनी प्रेमाचा खरा अर्थ आपल्याला शिकवला त्याबद्दल कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त केले, जे आमच्यावर बिनशर्त आयुष्यभर प्रेम करतात आणि ते आहेत आमचे पालक. मातृ पितृपूजन हा सर्वात प्रिय व्यक्ती म्हणजेच पालक आणि मुले यांच्यात वास्तविक स्वरुपात प्रेमाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. या शुभप्रसंगी ६०० पालक आणि विद्यार्थ्यांनी पालकाविषयी असलेल्या श्रध्देची प्राचीन परंपरा साजरी करण्यासाठी हा कार्यक्रम ऑनलाईन पाहिला. या वर्षी आम्ही सुमारे २० पालक शाळेत त्यांच्या मुलांसह जमले. त्याप्रसंगी तेथे कोविड प्रोटोकॉल पाळले गेले आणि शाळेच्या अधिकाऱ्यांनी काळजी घेतली.

मातृ पितृपूजनाचे दिव्य विधी चिन्मय मिशन, ठाण्याच्या आचार्या स्वामिनी निष्कलानंदजी यांनी केले. विद्यार्थी आणि पालकांनी घरी आणि काही पालकांनी व त्यांच्या पाल्यांनी शाळेत उपस्थित राहून मातृपितृपूजनाचा कार्यक्रम साजरा केला. या उत्सवात पवित्र आणि आकाशीय, 'मातृस्तवनम श्लोक' समाविष्ट होते. आईच्या नि:स्वार्थ आणि बिनशर्त प्रेमाच्या स्तुतीमध्ये मातृस्तवनम श्लोकाचे उच्चारण केले. पूजेनंतर नंतर 'गरबा' खेळला गेला.

यावेळी बोलतांना प्राचार्या श्रीमती राधामणी अय्यर (आर्य गुरुकुल, नांदीवली म्हणाल्या की, मातृपितृपूजनाची ही पारंपारिक पध्दत आई वडिलांच्या मुल्यांवर जोर देते आणि हा बंध साजरा करण्यास मदत करते. त्या पुढे म्हणाल्या की आई आणि वडिलांच्या उपासनेची संकल्पना आपल्या जीवनशैलीमध्ये खोलवर रुजलेली आहे आणि आईला पहिल गुरु मानला जातो. वडिलांना दुसरा गुरु आणि आचार्य हे तिसरे गुरु मानले जातात. ते असेही म्हणाल्या की, मी कोणत्याही शाळेला अशा कार्यक्रमाचे आयोजन करतांना पाहिले नाही जे आमच्या मुलांमध्ये उत्तम मुल्ये रुजवते. आजच्या पिढीसाठी हे आवश्यक मुल्य आहे आणि इतर शाळांमधेही त्याची पुरावृत्ती केली पाहिजे. त्यांनी यावर जोर दिला की ही परंपरा येत्या वर्षांसाठी आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी योगदान देईल. या कार्यक्रमाची सांगता शांतीपाठाच्या जयघोषाने झाली.

# महानगरपालिका क्षेत्रातील खड्डयांची तक्रार नोंदविण्यासाठी महापालिकेने सुरू केली टोल फ्री क्रमांकाची सुविधा

**कल्याण (प्रतिनिधी) :** गेले तीन महिने कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात सतत होणाऱ्या अतिवृष्टीमुळे रस्त्यावर पडलेल्या खड्डयांबाबतच्या तक्रारी सोशल मीडियाच्या माध्यमातून, वृत्तपत्रातून मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. पावसाची उघडीप मिळाल्याबरोबर महानगरपालिकेने यापूर्वीच खड्डे भरण्याचे/ रस्ते दुरुस्तीचे कामास प्रारंभ केला आहे. आता महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या सुविधेसाठी, महानगरपालिकेने रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांसाठी तक्रार नोंदविण्याकरिता १८०० २३३ ००४५ या टोल फ्री क्रमांक ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तरी नागरिकांनी रस्त्यांवरील खड्डयांबाबतच्या आपल्या तक्रारी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळी वरील टोल फ्री क्रमांकावर नोंदवाव्यात असे आवाहन महानगरपालिकेच्या शहर अभियंता सपना कोळी-देवनपल्ली यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

# दिव्यांग व आजारी व्यक्तींनी देखील

## महानगरपालिकेच्या लसीकरण योजनेचा लाभ घ्यावा

**कल्याण (प्रतिनिधी) :** कोरोना साथीचा प्रादुर्भाव अजूनही टळलेला नाही, परदेशात कोविडची तिसरी लाट आली आहे. भारतातही कोविडच्या तिस-या लाटेची शक्यता वर्तविण्यात आली आहे, या पार्श्वभूमीवर १८ वर्षावरील सर्व नागरिकांनी कोविशिल्ड/कोव्हॅक्सिन लस घेतली नसल्यास त्यांनी तातडीने जवळच्या लसीकरण केंद्रावर जावून लस घ्यावी. तसेच ज्या नागरिकांनी कोविशिल्ड लसीचा पहिला डोस घेतला आहे त्यांनी ८४ दिवस पूर्ण झाल्यावर व ज्या नागरिकांनी कोव्हॅक्सिन लसीचा पहिला डोस घेतला असेल त्या नागरिकांनी २८ दिवस पूर्ण झाल्यावर तातडीने दुसरा डोस घेणे आवश्यक आहे. कोविड-१९ चे लसीकरण हे पूर्णपणे सुरक्षित आहे व त्या पासून कोणत्याही प्रकारचा धोका संभवत नाही. त्यामुळे कोविड लसीचे २ डोस घेवून आपले आणि कुटूंबियांचे कोविड पासून संरक्षण करावे.

महापालिकेच्या कोविड लसीकरण मोहिमे अंतर्गत आपल्या घराजवळ ठिकठिकाणी लसीकरण सत्र चालविण्यात येत आहे. जेणे करुन प्रत्येक नागरिकाला याचा लाभ घेता येईल. लसीकरण केंद्रांची माहिती दररोज फेसबुक, व्हॉटस्घ्प, इन्टाग्राम , ट्विटर तसेच महापालिकेच्या संकेत स्थळावर दररोज सायंकाळी प्रसिध्द केली जाते. महापालिका क्षेत्रात दि. ०८ ऑक्टोबर ते दि. १४ ऑक्टोबर या कालावधीत महापालिका क्षेत्रातील १८ वर्ष वयोगटातील सर्व नागरिकांसाठी, प्रत्येक नागरी आरोग्य केंद्रामार्फत घरोघरी जावून लसीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे. दिव्यांग व आजारी व्यक्तींनी देखील महानगरपालिकेच्या लसीकरण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

# १० हजार फुकटया प्रवाशांकडून ७ महिन्यांत ७ लाखांचा दंड वसूल

**मुंबई :** बेस्ट मधील फुकटया प्रवाशांकडून प्रशासनाने चांगलाच दंड वसूल केला आहे. जानेवारी ते जुलै २०२१ या ७ महिन्यांत ० हजार ६३२ फुकटया प्रवशांवर कारवाई करत ७ लाख ५ हजार ९९२ रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. बेस्ट बसमध्ये विनातिकीट किंवा अंतरापेक्षा जास्त प्रवास करण्याऱ्यांविरोधात बेस्ट परिवहन कारवाईचा बडगा उगारला जातो.




विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरुध्द उघडण्यात आलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत जानेवारी ते जुलै २०२१ या ७ महिन्यांच्या कालावधीत एकूण १०,६३२ प्रवासी विनातिकीट आढळले असून त्यांच्याकडून ७ लाख एवढी रक्कम दंडापोटी वसूल करण्यात आली आली.

# राज्य विकासाच्या दृष्टीने नेण्याऐवजी सरकार कसं टिकेल याकडे सरकारच लक्ष म्हणून गुन्हेगारी वाढली

## - केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांची टीका




**कल्याण (प्रतिनिधी)** :राज्यात वाढत असलेल्या गुन्हेगारी बाबत केंद्रीय राज्य मंत्री कपिल पाटील यांनी राज्य सरकारला लक्ष केलं .

राज्यात चोरी बलात्कार आणि ड्रग्स चा प्रमाण वाढत चाललय, हा चिंतेचा विषय आहे. देशातील तरुण पिढी दुसऱ्या वाटेने भरकटत आहे, त्यांना ताळ्यावर आणायचं असेल तर कायदा सुव्यवस्था मजबूत केली पाहिजे ,कायद्याची भीती राहिली नाही म्हणून असे प्रकार वारंवार घडत आहेत ,कायद्याची भीती लोकांना वाटली पाहिजे, मात्र राज्य विकासाच्या दृष्टीने नेण्यासाठी याच काम सुरू नाही, काही करून सरकार टिकल पाहिजे अशी भावना आहे. म्हणून निर्णय होत नाही म्हणून असे प्रकार घडत आहेत .मुख्यमंत्र्यांनी याकडे लक्ष द्यावे अशी टीका केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी राज्य सरकारवर केली.

कपिल पाटील टिटवाळा रेल्वे स्थानकातील पादचारी पूल आणि सरकत्या जिन्याच्या उदघाटनकरिता आले होते. यावेळी कपिल यांनी एका रेल्वे प्रवासी संघटनेला देखील फटकारले. एका रेल्वे प्रवासी संघटनेच्या काही पदाधिकाऱ्यांनी या पुलाचे काम आमच्या पाठपुराव्यामुळे झाल्याचा मेसेज व्हायरल झाला होता. यावर बोलताना कपिल पाटील यांनी रेल्वे प्रवासी संघटनेची काही लोकं आहेत त्यांना वाटत की ही सगळी काम त्यांच्यामुळे होतात, २०१६ पासून या कामाचा पाठपुरावा मी करत होतो, शेवटच्या घावात दगड तुटला म्हणजे आधीचे घाव महत्वाचे नव्हते अस नाही. प्रवासी संघटनेमुळे काम झालं हा गैरसमज आहे. या कामाचं सगळं श्रेय या लोकसभेचा खासदार म्हणून माझं आहे. सगळ्यांनी एकत्र येऊन काम केलं तर अजून चांगलं काम होऊ शकतं अस स्पष्ट केलं.

# अध्यक्ष सलीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली महावितरणाला दिले निवेदन



**कल्याण** : कल्याण डोंबिवली शहर जिल्हा काँग्रेस अल्पसंख्यांक विभाग जिल्हा अध्यक्ष सलीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली, अल्पसंख्यांक विभाग उपजिल्हाध्यक्ष शिफा मशहर व मोठ्या संख्येने महिला यांनी महावितरण तेजश्री बिल्डिंग येथे जाऊन निवेदन देण्यात आले.

कोरोना काळात महावितरणचे मोठ्या सखेने आलेले बिल, आणि सध्याच्या परिस्थितीत नागरिकांना जॉब नाही. त्यात त्यांच्या घरात आजारी पेशंट. अशा अनेक समस्या असल्यामुळे लाईट बिल भरण्याची परिस्थिती नसल्याने. लाईट बिल भरायला मागेपुढे होते. त्यात महावितरण चे लोक येऊन लाईट बिल कट करून जातात. लाईट बिल वेळेवर न भरल्यामुळे दंड लावतात .अशा अनेक कंप्लेंट घेऊन नागरिक सलिम शेख व शिफा मशहर याच्याकडे गेले असता. आम्ही कोरोनाचे नियम पाळून दहा ते पंधरा लोक एम एस ई बी महावितरण अधिकाऱ्यांना जाऊन निवेदन दिले. की ज्या लोकांची परिस्थिती नाही अशा लोकांना थोडा तरी वेळ द्या. यावेळेस अधिकारीनी सलीम शेख यांना आपण ह्या गोष्टीवर नक्की तोडगा काढू असे आश्वासन दिले.

यावेळी अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष सलीम शेख, अल्पसंख्यांक विभाग उपाध्यक्ष शिफा मशहर ,पुष्पा तिवारी ,शमशेर खान, गुलाब मणियार, जाहेदा शेख, शबनम शेख ,फरीदा शेख, फिरदोज शेख, नाजिया खान, व्यंकट अम्मा, फिरोज गाजी ,अश्फाक शेख, शबनम खान, नर्गिस खान, रोशनी खान, संगीता नाईकनवरे, रुमान खतखाते, दानिश शेख, मंजू गोंड, बासित सय्यद, मंदा कवडे, चांद सय्यद ,नबी मोला, रेहाना बेगम, सरोज शर्मा, सुशील प्रसाद, अजय फुमकिया, हिना खान रेहान शेख, इशरत शेख मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# साद मोबाईल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स शॉपची ग्रँड ओपनिंग



**कल्याण (प्रतिनिधी)**: साद मोबाईल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स शॉप ची ग्रँड ओपनिंग इशाक बर्डी यांनी केली. प्रथमच मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स शॉप ओपनिंग या प्रभागात करण्यात आली आहे.

शॉप नंबर १४, राधे हरी निवास, ग्राउंड फ्लोअर, डॉक्टर अन्सारी चौक, पोलीस चौकी, कल्याण वेस्ट, करण्यात आले. नागरिकांना इलेक्ट्रॉनिक वस्तूंसाठी मार्केटला जावे लागते. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून इशाक बर्डी यांनी या प्रभागात हे शॉप चालू केले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांनी इशाक बर्डी यांना शुभेच्छा दिल्या.

या शॉपमध्ये नागरिकांन साठी आयफोन, सॅमसंग, ओपो, विवो सर्व प्रकारचे फोन्स येथे उपलब्ध आहेत. इलेक्ट्रॉनिक मध्ये वॉशिंग मशीन, फ्रीज, एसी, मिक्सर ग्राइंडर, असे अनेक इलेक्ट्रॉनिक्स वस्तू ह्या शॉप मध्ये नागरिकासाठी उपलब्ध आहेत. ते पण मार्केट पेशा वाजवी भावात आणि चांगली सर्विस नागरिकांना ह्या शॉप मध्ये मिळणार आहे. तरी नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा.

यावेळी अहमद गुलजार कांबळे, शरफुद्दीन करते, मुफ्ती फुकान, मुजम्मिल तांबोळी, मुस्तफा चुनचुन, इस्माली बर्डी, परवेज मिर्झा, अब्दुल्ला बर्डी, सूफियान शेख, शादाब बर्डी, डॉक्टर शहाबाज खान मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

# राहुल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्वखर्चाने विविध उद्घाटन





**कल्याण (प्रतिनिधी)**: माजी सरपंच अडवली धोकळी गावचे माजी सरपंच राहुल पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांतून साजरा करण्यात आला .समर्थनगर परिसरामध्ये गेल्या कित्येक वर्षांपासून चाळीतील नागरिकांना रस्ता नव्हता. तसेच रस्त्यांवरील उघड्या गटारांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोकाही निर्माण झाला होता .हे लक्षात घेता राहुल पाटील यांनी स्वखर्चाने समर्थ नगर मधील नागरिकांना सिमेंट रस्ता बनवून दिला. याच सोबत गावांमधील रस्त्याची दुरवस्था पाहता. येथे मोठ्या रस्त्याचा शुभारंभ करण्यात आला. आदी कामांचा शुभारंभ राहुल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्वखर्चाने करून देण्यात आला आहे. राहुल पाटील हे दरवर्षी आपला वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांतून साजरा करतात. परंतु यावर्षी द्वारली तसेच समर्थनगर परिसरामध्ये गेले असता नागरिकांनी राहुल पाटील यांच्याकडे रस्त्याचा समस्ये बाबत मागणी केली असता.त्यांनी रस्त्याचे काम करून देण्यात आले. राहुल पाटील यांनी नागरिकांशी संवाद साधताना कळले की नागरिकांना पाण्याचीही समस्या आहे. राहुल पाटील यांनी एक ते दोन दिवसात पाण्याची समस्या ही सोडवतो आश्वासन दिले.यावेळी महेश दादा गायकवाड ,उद्योगपती पंढरीनाथ पाटील. माजी सरपंच बळीराम भाने ,माजी उपसरपंच वासुदेव गायकर, तंटामुक्ती अध्यक्ष विजय भाने, उद्योगपती किशोर भाने, आई एकविरा महिला मंडळ अध्यक्ष सोनी ताई क्षीरसागर समाजसेवक संदीप क्षीरसागर,सोनू ठाकुर तानाजी पाटील आडिवली द्वारली ग्रामस्थ नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कॉंग्रेस अल्पसंख्यांक विभागातर्फे गांधी जयंती निमित्त गरीब गरजू नागरिकांना अन्नधान्यांचे किट वाटप



**कल्याण (प्रतिनिधी)**: गांधी जयंती निमित्त कल्याण-डोंबिवली शहर जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याक विभाग जिल्हा अध्यक्ष सलीम शेख व अल्पसंख्याक विभाग उपजिल्हा शिफा मशहर यांच्यातर्फे गांधी जयंती निमित्त भागातील गरीब गरजू नागरिकांना अन्नधान्यांचे किट वाटप्यात आले.

अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष सलीम शेख अल्पसंख्याक विभाग उपाध्यक्ष शिफा मशहर यांनी त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात गांधी जयंती साजरी केली. यावेळी पुष्पा तिवारी, शमशेर खान , जाहिदा शेख, शबनम शेख, फरीदा शेख, फिरोज शेख, अश्फाक शेख, नाजिया खान, व्यंकट आम्मा, फिरोज गांजी, अश्फाक शेख, नर्गिस खान ,रोशनी खान ,संगीता नाईक नवरे, रुमान खतखाते, दानिष शेख, मंजू गोड ,बासीत सय्यद, मंदा कवडे ,चांद सय्यद, नबी मोल्ला, रेहाना बेगम, सरोज शर्मा ,सुनील प्रसाद ,अजय फुमकिया, हिना खान, रेहान शेख, इशरत शेख आदी कार्यकरते, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# प्रेमा प्रकाश म्हात्रे यांच्यावतीने लसीकरण शिबिराचे आयोजन



**कल्याण (प्रतिनिधी)** : संपूर्ण राज्यात सध्या कोविड-१९ चा प्रादुर्भाव जरी कमी होत असला तरी त्यांच्या रोगप्रतिकार म्हणून नागरिकांसाठी प्रतिबंधात्मक लसीकरणाची मोहीम जास्तीत जास्त राबविण्याची आवश्यकता आहे. या उद्देशाने तसेच नागरिकांची लसीकरणासाठी ज्याप्रकारे वृद्ध नागरिकांची व ज्येष्ठ नागरिकांची धावपळ होते. तसेच प्रत्येक गावांमध्ये जाण्यासाठी एक तासाचे अंतर पार पाडावे लागते याचा नाहक त्रास वृद्ध व ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत असल्याचे देखील निदर्शनास येत आहे . हे लक्षात घेता . नांदिवली गाव परिसरात नागरिकांसाठी प्रभाग क्रमांक ११३ च्या नगरसेविका प्रेमा प्रकाश म्हात्रे यांच्या प्रयत्नाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने मोफत लसीकरण आयोजित करण्यात आले.श्री बामन देव मंदिर नांदिवली येथे करण्यात आली आहे.

सध्या रेल्वे, मॉल्स तसेच इतर ठिकाणी प्रवेश करण्यासाठी लसीचे डोस अनिवार्य ठरत आहे . लसीचे दोन डोस घेतले नसेल तर परवानगी मिळत नाही हे लक्षात घेता.नांदिवली गावातील जास्तीत जास्त नागरिकांन साठी लसीकरण उपलब्ध करण्यात आले आणि यापुढेही आम्ही प्रयत्न करणार आहोत. मोठ्या संख्येने नागरिकांनी या लसीकरणाचा लाभ घेतला. आलेल्या नागरिकांनी म्हात्रे यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश गोविंद म्हात्रे ,नगरसेविका प्रेमा प्रकाश म्हात्रे, विभाग प्रमुख अनिल सिताराम म्हात्रे, शाखाप्रमुख यशवंत बाबुराव म्हात्रे, माजी सदस्य संगीता अनिल म्हात्रे, एकनाथ मामा पाटील ,विकास देसले ,परेश पाटील ,शाम म्हात्रे, शिवदास म्हात्रे, अक्षय नारायण मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## ....पान १ वरुन.. अर्जुनभाई पाटील



महायज्ञ शिबिर ठेवण्यात आले आहे यासाठी यात कल्याण-डोंबिवली मधून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत हजारपेक्षा अधिक कार्यकर्ते पदाधिकारी व नागरिक ठाण्याच्या दिशेने निघाले आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी स्थानिक नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी कल्याणमधून मोठ्या प्रमाणात बस सेवा ठेवली असून या बसमधून नागरिक ठाण्यात पोहोचून रक्तदान करणार आहेत. माजी सरपंच काटई अर्जुन भाई पाटील यांनी मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी रक्तदान केले.

## ....पान १ वरुन.. आत्महत्येचा प्रयत्न

केल्यानंतर त्या मुलाला सायन रुग्णालयात पाठवण्यत आले. त्या मुलाची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले. तर अपघातात जखमी झालेल्या बानूला पोलिसांनी रुग्णालयात नेले. तेथे तिला डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांना अपघाताच्या ठिकाणी एक बॅग आढळून आली. त्या बॅगेत असलेल्या आधारकार्डवरुन पोलिसांनी बानूची ओळख पटवत तिच्या नवऱ्याला संपर्क केला. बानूच्या आत्महत्येप्रकरणी पोलिसांनी तिच्या नवऱ्याचा जबाब नोंदवून घेतला. तिच्या नवऱ्याचा जबाब नोंदवून घेतला. तिच्या आत्महत्येचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही.

## ....पान १ वरुन.. महेश गायकवाड वाढदिवस

आई तिसगाव रोड वरील आई गुंजाई या चौकाचे उद्घाटन देखील करण्यात आले. लोकांनी वेगवेगळ्या ठिकाणी केक कापून त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमा प्रसंगी समस्त शिवसैनिक नागरिक महिला मंडळ ग्रामस्थ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हरवली आहे



सदर व्यक्ती राजश्री शंकर सावंत राहणार सुभाष नगर, लालचौकी वय वर्ष ४० ही १-९-२०२१ रोजी १:१५ दुपार पासून गणेश मंदिर,लालचौकी येथून बेपत्ता आहे.निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस व निळ्या रंगाची कान टोपी परिधान केली आहे. कुठेही आढळल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

मिलिंद कामटेकर ■ उपम राणे

९८१९९७५१३० / ८६५७३२७४४३

# टिम वर्क हेच कोविड कालावधीतील यशाचं गमक

## - आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**कल्याण (प्रतिनिधी):** टिम वर्क हेच कोविड कालावधीतील यशाचं गमक आहे, असे उद्गार महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले कला मंदिरात कोविड नियमांचे पालन करुन संपन्न झालेल्या महापालिकेच्या वर्धापन दिन समारोहात महापालिका सचिव संजय जाधव यांनी घेतलेल्या मुलाखतीत बोलतांना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हे उद्गार काढले. या मुलाखतीत बोलतांना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आपल्या काराकिर्दीतील वेगवेगळया घडामोडींची माहिती दिलखुलासपणे प्रेक्षकांसमोर मांडली. कोविडच्या लढाईने एक वेगळीच उर्जा सगळयांना दिली, ती वापरुन नागरिकांचे प्रश्न सोडवू या, नागरिकांच्या सेवेसाठी पुन्हा एकदा वचनबध्द होऊया असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित सर्व अधिकारी वर्गाला केले.



महापालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजिलेल्या या छोटेखानी समारंभात कोविड कालावधीत महापालिकेला मदत केलेल्या / करणाऱ्या डॉक्टर्स आर्मीतील डॉक्टरांचा, आयएमए, निमा, धारपा, केम्पसवा या वैद्यकीय संघटनांतील अध्यक्षांचा, बाज आर आर रुग्णालयाचे डॉ. अमिर कुरेशी, निऑन रुग्णालयातील मिलिंद शिंदे, होलिक्रॉस हॉस्पिटलच्या सिस्टर शिबा यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे महापालिकेला कोविड कालावधीत मदत करणाऱ्या विविध एनजीओ, कोविडच्या पहिल्या लाटेत अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या दानशूर व्यक्ती, गुरुद्वारा, कल्याण पश्चिम, संत गजानन सेवा ट्रस्ट यासारख्या सेवाभावी संस्था यांना देखील या समयी सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

कोविड कालावधीत महापालिकेस सातत्याने सहकार्य करणाऱ्या पोलिस अधिकारी कर्मचारी वर्गाचा, महापालिका क्षेत्रातील स्मशानभुमीमध्ये सेवा देणाऱ्या व्यक्तींचाही महापालिका आयुक्त यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच कोविड कालावधीत उत्कृष्ठ काम केलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गाचा तसेच विविध पत्रकार संघटनांचा देखील प्रतिकात्मक स्वरुपात यावेळी सत्कार करण्यात आला. या समारोहास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी सपत्नीक उपस्थित होते. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे आई-वडील देखील हा सोहळा पाहण्यासाठी समक्ष उपस्थित होते. तसच महापालिका क्षेत्रातील डॉक्टर्स, आर्मीतील डॉक्टर्स, एनजीअेज, अप्पर पोलिस आयुक्त दत्तात्रय कराळे, पोलिस उपायुक्त गुंजाळ, महापालिकेचा अधिकारी वर्ग या कार्यक्रमास उपस्थित होता.

महापालिकेच्या कर्मचारी वर्गाने विशेषत: आरोग्य विभागातील कर्मचारी वर्गाने बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, उपआयुक्त विनय कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे यांनी स्वत:च्या आवाजात सुमधुर आवाजत गाणी गाऊन तसेच कार्यकारी अभियंता सुनिल जोशी यांनी आपल्या एकपात्री अभिनयाने कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महापालिका सचिव तथा विभागप्रमुख, माहिती व जनसंपर्क-संजय जाधव, दत्तात्रय लदवा, महेश देशपांडे यांनी केले.

# बिर्ला कॉलेज महाविद्यालयाच्या सौंजन्याने अंकुर अनाथ आश्रमात मोफत शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**टिटवाळा (प्रतिनिधी)** - सर्वत्र कोरोनाच सावट आहे कोरोना जरी कमी होत असला तरी देशाची, समाजाची आर्थिक परिस्थिती ढासळलेली आहे. शाळा- कॉलेजेस जरी सूरु झाले असले तरी मुलांना शैक्षणिक साहित्याची कमतरता व गरज भासत आहे.

त्या अनुषंगाने, ६/ऑक्टोबर २१ रोजी बी. के बिर्ला कॉलेज महाविद्यालयाच्या सौंजन्याने व बी.के बिर्ला कॉलेज एनएसएस युनिट तर्फे टिटवाळा येथील म्हसकल या गावात तसेचे त्या लगत असलेल्या अंकुर या अनाथ आश्रमात मोफत शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले.

एक वेगळी ऊर्जा व एक वेगळा संदेश बी.के. बिर्ला कॉलेजच्या एनएसएस युनिट तर्फे गावातील मुलांना देण्यात आला. नुसते च वाटप झाले नाही एनएसएस युनिट च्या स्वयंमसेवकांनी समाज जागृती केली, गावातील मुलांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले एक प्रकारे जनजागृती घडवून आणली एक आगळा वेगळा उपक्रम महाविद्यालयाच्या एनएसएस युनिट तर्फे



राबवण्यात आला. एक नवं चैतन्याच वातावरण गावातील मुलांमध्ये निर्माण करण्याचे काम येथे करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये बिर्ला कॉलेजचे शैक्षणिक संचालक नरेश चंद्र सर, महाविद्यालयाचे प्राध्यापक अविनाश पाटील सर, वाणिज्य शाखेचे उप-प्राध्यापक डॉ. बिपीनचंद्र वाडेकर, त्याच प्रमाणे महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदेश जायभाये, डॉ सोनाली पाटील, कृष्णा घोडे सर व एनएसएस युनिटचे स्ज्च राहूल परदेशीं, रूपसा नासकर, ओम सावंत, हेमल शिंदे त्याच प्रमाणे युनिट चे लीडर जितेन महाजन, अजित खोडकर, कोमल यशवंते, गौरव भोई, सिद्धी भोसले, मानस दास, मंजिरी म्हात्रे, कोमल शर्मा, प्रतिक्षा यादव, सायली शिर्के, मनाली खुंटे, विधी उबाळे, निकिता शेळके, मेघना सुतार, श्रुती तेलवने, रोशनी करार, यश दाभाडे, पृथ्वीराज यमगर इत्यादीनीं मोलाची कामगिरी बजावली.

# अग्रसेन चौक ने वाढली शहराची शोभा

**कल्याण (प्रतिनिधी):** कल्याण-डोंबिवली महापालिका प्रभाग क्रमांक ३ च्या नगरसेविका शालिनी सुनील वायले व विभाग प्रमुख सुनील राजाराम वायले यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे त्यांच्या



प्रभागांमध्ये महाराजा अग्रसेन चौक आणि महाराजा अग्रसेन पोलीस चौकी चे उद्घाटन कल्याण लोकसभा खासदार श्रीकांत शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. गेल्या कित्येक वर्षापासून कल्याण मध्ये वसंत व्हॅली परिसर हा मोठ्या चर्चेमध्ये आहे. परंतु त्या परिसराला नावच नव्हते हे लक्षात घेता शालिनी सुनील वायले यांनी आमदारांकडे पाठपुरावा केला. आमदार विश्वनाथ भोईर यांच्याकडून होकार येत काही महिन्या आधी चौक सुशोभिकरनाचा शुभारंभ करण्यात आला होता . लवकरात लवकर त्या चौकाचे सुशोभिकरण करत आता महाराजा अग्रसेन यांचे नाव देत या चौकाचे उद्घाटन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आमदार विश्वनाथ भोईर, अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ, समाज सेवक राकेश मोदी, उद्योगपती महेश अग्रवाल आदी पदाधिकारी व शिवसैनिक, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रमोद दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काटई गाव येथे भव्य लसीकरण शिबिराचे आयोजन

**डोंबिवली (प्रतिनिधी) :** सध्याची परिस्थिती पाहता सगळीकडे लसीकरण



अनिवार्य ठरत आहे. मॉल, रेल्वे अशा अनेक ठिकाणी लसीकरण करणे गरजेचे आहे. काटई गावातील एक दिवसीय भव्य लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार प्रमोद दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काटई गावचे समाजसेवक विनोद रतन पाटील, माजी उपसरपंच काशिनाथ कान्हा पाटील यांच्या प्रयत्नाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने दि ८ रोजी जिल्हा परिषद शाळा, काटईगाव कल्याण, शीळ रोड, येथे एक दिवसीश मोफत भव्य असे लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले.

हे लसीकरण शिबिर काटई , उसरघर आणि घारवली गावातील नागरिकां साठी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पहिला व दुसरा डोस नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आला. मोठ्या संख्येने नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. नागरिकांनी काशिनाथ पाटील यांचे आभार व्यक्त केले. सदर शिबिरामध्ये काटई गावातील जय दुर्गा माता क्रिकेट संघ, काटईचे मनसे शाखा अध्यक्ष विनोद चौधरी, रंगनाथ चौधरी, अनंता पाटील, अनंत बुवा चौधरी, विश्वास पाटील, उपविभाग अध्यक्ष क्रांती पाटील, रोहित पाटील, कौस्तुभ पाटील, राजदीप चौधरी, प्रमोद पाटील, राजेश पाटील, अनिल पाटील प्रसंगाने कार्यकर्ते पदाधिकारी काटई, उसरघर, घारेवली गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्तदान महायज्ञासाठी कल्याणहून हजारो नागरिक ठाण्याला रवाना

**कल्याण (प्रतिनिधी) :** रक्ताचा तुटवडा असल्याने शिवसेना पक्षप्रमुख व राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जनतेला रक्तदान करण्याचे आव्हान केले होते. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत रक्ताची गरज असलेल्या रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी विविध सामाजिक संस्था संघटनांकडून राज्यभरात ठिकठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करत आहे. त्याचप्रमाणे पालक मंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यातील सर्व नगरसेवक व कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणात रक्तदान करण्याचे आवाहन केले. ठाण्यातील जांभळी नाका परिसरामध्ये मोठे रक्तदान महायज्ञ शिबिर ठेवण्यात आले आहे. यासाठी कल्याण-डोंबिवली मधून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत हजारपेक्षा अधिक कार्यकर्ते, पदाधिकारी व



नागरिक ठाण्याच्या दिशेने निघाले. त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी स्थानिक नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी कल्याणमधून मोठ्या प्रमाणात बस सेवा ठेवली असून या बसमधून नागरिक ठाण्यात पोहोचून रक्तदान करणार आहेत.

# राहुल पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे आडिवली नगरीचे चित्र पालटणार

## खासदारांकडून रस्त्याच्या प्रश्नाला हिरवा सिग्नल

**कल्याण (प्रतिनिधी) :** कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे तक्रारींना न्याय देत आहेत, याचाच एक भाग म्हणून नगरसेवक महेश गायकवाड यांनी आपल्या



हे आपल्या मतदार संघात ठिकठिकाणी जनता दरबार घेऊन नागरीकांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित केलेल्या खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या जनता दरबारात दिडशेहून अधिक तक्रारदारांनी हजेरी लावून आपल्या तक्रारीं पाढा खासदारांसमोर मांडला.

त्यामध्ये अडवली ढोकळी गावचे माजी सरपंच राहुल पाटील यांनी आडीवली गावातील रस्त्याची समस्या खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे मांडली असता त्यांच्या पाठपुराव्याला होकार मिळत आडीवली नगरीला आता सुसज्ज रस्ता मिळणार असल्याचे स्पष्ट प्रतिपादन राहुल पाटील यांनी केले आहे.

# स्वप्ना क्रांती पाटील यांनी मुलीच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे केले आयोजन

**कल्याण (प्रतिनिधी):** माजी सरपंच उसरघर उपविभाग अध्यक्ष क्रांती पाटील व महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेना उपशहर अध्यक्ष स्वप्ना क्रांती पाटील यांनी आज्ञा क्रांती पाटील आपल्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त उसरघर, गणपती मंदिर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

क्रांती पाटील व स्वप्ना पाटील यांनी आपल्या मुलीचा वाढदिवस समाज उपयोगातून साजरा करण्यात आला.

या शिबिरात नहार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मार्फत वैद्यकीय तपासणी बी.पी. एस. पी. असे अनेक शिबिर मोफत ठेवण्यात आले.

आलेल्या



२, मोफत औषध उपचार, सर्दी, ताप, खोकला, जुलाब, अंगदुखी, उलटी अशा अनेक आजारांवर औषध मोफत देण्यात आले. तसेच वैद्यकीय सल्ला-स्त्री रोग तज्ञ, अस्थिरोग तज्ञ, पोटाचे विकार, डोळे तपासणी नागरिकांनी आज्ञा पाटीलला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. क्रांती पाटील व स्वप्ना पाटील याच्ये नागरिकांनी आभार व्यक्त केले.

यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भोईर, सरोज भोईर, माजी नगरसेविका मंदा पाटील, माजी नगरसेविका कोमल पाटील, मनसैनिक संदीप पाटील, केतन पाटील, अमित पाटील, संतोष सते, राजा संते, अतुल संते , सुरज सांते , मनीषा पाटील, प्रीती फलके, उसरघर ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

....पान १ वरुन.. सलीम शेख

निवेदन देत यातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.लखीमपूरमधील घटनेच्या निषेधार्थ राज्यातील महाविकास आघाडी सरकारने आज महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. त्याला प्रतिसाद देत कॉंग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाच्या कार्यकर्त्यांनी स्टेशन परिसरात एकत्र येत तहसीलदार कार्यालयावर धडक दिली. केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांच्या मुलाने आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर गाडी चालवत अत्यंत क्रूरपणे चिरडले आहे. या घटनेचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या कॉंग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांना अटक देखील केली होती. याच्या निषेधार्थ बंद पाळण्यात आला आहे. उत्तर प्रदेश मध्ये गुंडाराज सुरु असून हे सरकार जेव्हा सत्तेत आलं तेव्हा त्यांनी सांगितलं होतं कि हे गरिबांचं सरकार आहे मात्र तसे दिसत नाही. कित्येक महिन्यांपासून शेतकरी आंदोलन करत आहेत त्यांना भेटण्यासाठी पंतप्रधान मोदी यांना वेळ भेटत नाही पण अमेरिकेला जायला वेळ आहे.लखीमपूर येथे अत्यंत बेदरकारपणे गाडी चालवत शेतकऱ्यांना चिरडणाऱ्या केंद्रीय मंत्री अजय मिश्र यांच्या मुलाला कठोर शिक्षा करून अजय मिश्रा यांचा राजीनामा घ्यावा आणि उत्तर प्रदेश मधील योगी सरकार बरखास्त करण्याची मागणी यावेळी सलीम शेख यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.